# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०३/०६/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ०३/०६/२००४ रोजी सभा सुचना क्र. ०३ दि. २९/०५/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ७) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ८) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १०) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ११) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १२) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| २) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |

### रजेचा अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

पान नं. ८ वर स्थायी समितीच्या चार सदस्यांनी मागणी केल्यावर नियम द्यायला पाहिजे असे जे आहे तर मा. महासभा बोलवायला पाहिजे अशी दुरूस्ती करा.

**प्र. सचिव :-**

मा. महासभा बोलावण्यात येईल ही दुरुस्ती करण्यात येईल.

**प्रकरण क्र. १२ :-**

दि. ०६/०५/२००४ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १७ :-**

दि. ०६/०५/२००४ रोजीचे मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती अनुमोदन :- श्री. मोहन पाटील**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३ चे वाचन केले.)

**याकुब कुरेशी :-**

विषय क्र. १३ हा ॲक्चुली काय आहे? दर वाढविण्याबाबत आहे का कमी करण्याबाबत आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

महाराष्ट्र शासनाने महापालिका हद्दीमध्ये आय.टी.पार्क रिर्झव्ह करण्याकरिता शासनाने शासकीय धोरण ठरविले आहे आणि त्या धोरणामध्ये आय.टी.पार्कमध्ये आय.टी.पार्क जिथे जिथे जागा डेव्हलप केले तिथे मालमत्ता कर, जकात कर आणि इतर बाबींच्या सवलती शासनाने घोषित केलेल्या आहेत. तो आय.टी. पार्क सध्या आपल्या विकास आराखडयात नाही आहे आणि तो विकास आराखडयातसुध्दा प्रस्तावित करावा लागेल आणि त्या दृष्टिने हा प्रस्ताव आपल्याकडे शासनाच्या आदेशाप्रमाणे स्थायी समितीसमोर आलेला आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, आतापर्यंत आपल्याला तेच समजलेले नाही की, मुलगा होणार का मुलगी? त्याच्या अगोदरच आपण नाव ठेवायला परवानगी दिलेली आहे. माझे म्हणणे असे आहे की, विकास आराखड्यामध्ये जी वस्तु नाही ती ह्या विषयामध्ये घ्यायचे कारणच नव्हते. उगाच घेतलेला हा विषय आणि आपण उगीच ह्या विषयावर चर्चा करण्याला काय अर्थ नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. कुरेशी साहेब शासनाचे धोरण असे आहे की, आय.टी. पार्क विकसित होण्याकरिता शहरामध्ये आणि प्रत्येक महानगरपालिका हद्दीमध्ये आणि ते आय.टी. पार्क विकसित करण्या अगोदर जनतेला ते माहिती पाहिजे की, ह्या ह्या सवलती शासनाने दिलेल्या आहेत. तर त्या सवलती जर इम्प्लीमेंट करायचे असेल तर त्याला सभेची आवश्यकता आहे आणि सभेने जर मंजुरी दिली तर ह्या सवलती आम्ही आय.टी. पार्क क्षेत्रासाठी लागू केलेल्या आहेत. तेव्हाच त्या भागातले रहिवासी किंवा त्या भागातले नागरिक व जे जमीन मालक आहेत ते आय.टी. पार्कसाठी पुढे येतील. हे शासनाचे धोरण आहे.

**धनराज अग्रवाल :-**

ते बनवणार कुठे?

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सभापती साहेब, पण हे आपल्याकडे विकास आराखड्यामध्येच नाही आहे. कुठेच आपण नमुद केलेले नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

गेल्या वेळेस गेल्या आराखड्याप्रमाणे आपण आय.टी. पार्क प्रस्तावित केला होता.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, माझ्या दोन-तीन प्रश्नाचे याबाबत उत्तर पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे या ठिकाणी मालमत्ता कर आणि ह्या मालमत्ता कराचे दर काय आहेत? निवासी आणि अनिवासीसाठी सध्याचे प्रचलित दर काय आहेत? ह्याची आपण माहिती द्या आणि आता राज्य शासनाकडून मा. मुख्यमंत्री ह्यांच्याकडून हा विषय आलेला आहे तर जे आय.टी. पार्कचे दर आहेत तर निवासी अनिवासीचे दर सांगा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

महाराष्ट्र शासनाने आय.टी. पार्क डेव्हलपमेंट झोनमध्ये अशी तरतुद केलेली आहे की, झोन त्याला रिझर्व्ह असावा असे ही नाही.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, सर्व मान्य आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण झोन नक्की केले आहे का? आय.टी. पार्क कुठे करायचे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण कोणीही जर जमीनधारक इच्छूक असेल त्याला जर आपण नागरिकांकडून सुचना दिल्या, आपल्या नगरपालिकेतून सुचना दिल्या की, ह्या मालमत्ता करात आम्ही त्यांना माफ करणार आहोत किंवा ह्या सवलती देणार आहोत. जकात कर माफ करणार आहोत. तर अनेक इच्छूक आपल्याकडे येतील आणि ते आय.टी. पार्क विकसित करण्याकरिता इच्छूक असतील ते आपल्याकडे येतील.

**धनराज अग्रवाल :-**

ह्याबाबत आपण ॲडव्हरटाईजमेंट काढणार आहोत का?

**आसिफ शेख :-**

मी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करा की, सध्याच्या मालमत्ता कराचे निवासी आणि अनिवासीसाठी दर काय आहेत? आणि त्याच्यानंतर आय.टी. पार्कचे दर शासनाने ठरविले आहेत का? त्याचे विश्लेषण करा. आपण एक-एक गोष्टीचे व्यवस्थित स्पष्टीकरण द्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. आसिफ शेखजी निवासीला एक रुपये साठ पैसे एवढा दर आहे आणि अनिवासीला दोन रुपये चाळीस पैसे आहेत.

**आसिफ शेख :-**

आय.टी. पार्कचे दर शासनामार्फत काही निश्चित केले आहेत का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आय.टी. पार्कला निवासी तत्वावर, पुन्हा औद्योगिक प्रयोजनासाठी तो वापर न समजता निवासी तत्वावर सवलती द्याव्यात असा शासनाचा आदेश आहे.

**आसिफ शेख :-**

शासनाने ह्याचे दर निश्चित केले आहेत का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यांनी सर्वांनाच कळविले आहे की, निवासी तत्वावर आकारणी करावी. औद्योगिक तत्वावर आकारणी करु नये.

**आसिफ शेख :-**

असा जी.आर. त्यांनी काढण्यांत आला आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

होय, असा जी.आर. काढण्यांत आला आहे.

**मा. सभापती :-**

आपले इलेक्ट्रोनिक झोन मोठे आहे. त्याच्यातच आय.टी. पार्क केले तर बरे होईल.

**आसिफ शेख :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ११ चे कलम १४९(५) ह्याचे वाचन करण्यांत यावे. त्या अधिनियमाप्रमाणे काय म्हटले् आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

१९४९ चे प्रकरण ११ चे कलम १४९(५) यामध्ये कोणत्याही करासाठी निश्चित केलेल्या दरात किंवा व्यक्तींच्या किंवा वस्तुंच्या किंवा मालमत्तांच्या दरात किंवा वर्गामध्ये किंवा त्यापासून कोणतीही सुट द्यावयाची असल्यास तिच्यात कोणतेही फेरफार करण्याचे महापालिका वेळोवेळी ठरवील त्यास ह्या कलमानुसार तरतुदीस शक्य असेल तर कितपत लागू होतील, असे त्यामध्ये म्हटले आहे.

**आसिफ शेख :-**

अधिनियमाप्रमाणे नियम जो दिला आहे तो अगदी स्वयंस्पष्ट आहे. त्यामध्ये म्हटले आहे जर दर निश्चित केले तर, पण दर अजून निश्चिम आपण काही केलेले नाहीत आणि जर सवलती द्यायच्या असतील तर सवलतीही आपण अजून दिलेल्या नाहीत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याच्याकरिताचा हा प्रस्ताव आहे.

**आसिफ शेख :-**

आपण आय.टी. पार्कचे दर निश्चित करा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आय.टी. पार्कबाबत शासनाचा जी.आर. आहे. त्यामध्ये त्यांनी स्पष्ट म्हटले आहे की, निवासी तत्वावरच त्याची आकारणी करावी, औद्योगिक तत्वावर आकारणी करु नये.

**आसिफ शेख :-**

आपल्या टिपणीमध्ये आपण म्हटले आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कोणतेही आय.टी. पार्क नाहीत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सध्या आपल्याकडे नाही आहेत.

**आसिफ शेख :-**

आपल्याकडे डी. पी. प्लॅन आहेत त्यामध्येही नाही आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याच्यामध्ये नाही आहे.

**आसिफ शेख :-**

मग नविन आरक्षण करायचे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

शासनाने आय.टी. पार्कची योजना विकसित करण्याच्या दृष्टीने कोणत्याही झोनमध्ये आपण आय.टी. पार्क विकसित करु शकतो अशा त-हेचा शासनाचा निर्देश आलेला आहे.

**आसिफ शेख :-**

सभागृह शासनाच्या भावानांशी सहमत आहे. त्यात कोणत्याही सन्मा. सदस्यांचे दुमत असण्याचे कारण नाही. पण अद्यापही आपल्याकडे आय.टी. पार्क नाही आहेत व भविष्यकाळात शासनातर्फे शासकीय स्तरावर प्लॅनमध्ये जर फेरबदल झाला आणि जर आय.टी. पार्क आपल्याकडे प्रस्तावित करण्यांत आला तेव्हा आपण दर लावू त्यांना. आता आपण ठराव करुन घेऊ.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेखजी आय.टी. पार्कसाठी आरक्षण रिझर्व्ह करण्याची आवश्यकता शासनाने शिथील केलेली आहे. आय.टी. पार्क हे कोणत्याही झोनमध्ये करु शकण्याची तरतुद अधिनियमामध्ये शासनाने केलेली आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सभापती महोदय, विषय चांगला आहे आणि शहराच्या विकासाच्या दृष्टीकोनातून विषय अत्यावश्यक आहे असे मी समजतो. परंतु ह्याच्यामध्ये एक विषय हा धोरणात्मक विषय होऊ शकतो आणि दुसरा विषय म्हणजे चर्चेला विषय आला म्हणून त्याच्यावर सभागृहात चर्चा करणे हे क्रमप्राप्त आहे आणि त्याच्यावर चर्चा व्हायला पाहिजे. परंतु ज्या आपल्या डी.पी. प्लॅनमध्ये जर आय.टी.ची सुविधा नाहीच आहे. कारण ह्यापुर्वी आपल्याकडे आय.टी. पार्क होता. परंतु त्याची हेअरिंग घेऊन पॉलिटीकली तो विषय गेला. राजकीय होऊन तो विषय येथून निघून गेला. त्याच्यानंतर पुन्हा विषय आला पाहिजे असे आमचे ही मत आहे. परंतु, जोपर्यंत कोणत्याही ठिकाणी आपण आय.टी. पार्क आपण आणत नाही किंवा त्याचे आपण तसा ठराव घेऊन मा. महासभेपुढे ठराव घेऊन त्याची तरतुद आपण करत नाही. तोपर्यंत आय.टी. पार्क येऊ शकत नाही. म्हणून सभापती महोदय, हा विषय मा. महासभेचा विषय आहे. आपण हा विषय आणला आणि त्याच्यावर चर्चा केल्यानंतर आपल्या सर्व सदस्यांच्या ज्ञानामध्ये थोडी फार भर ही झाली त्याबद्दल आपणाला धन्यवाद देतो. परंतु, हा विषय आपण मा. महासभेपुढे घेऊन जायला पाहिजे. एक तर हा धोरणात्मक विषय आहे आणि दुसरा विषय हे जे आहे ते संपूर्ण डी.पी. प्लॅनमध्ये नसल्याकारणाने ते आपल्याला तसे आय.टी. पार्क करणे क्रमप्राप्त

आहे आणि जर आय.टी. पार्क झाला तर आपल्या शहराचा विकास होऊ शकेल म्हणून कृपया आपण हा विषय मा. महासभेसमोर आणावा अशी मी सभापती महोदयांना विनंती करतो. धन्यवाद.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

हा विषय मा. महासभेसमोर शिफारस करायचा आहे.

**मा. सभापती :-**

सदर विषय मा. महासभेसमोर शिफारस करण्यांत यावा.

**अनंत पाटील :-**

अध्यक्ष महोदय, ह्यामध्ये इंडस्ट्रीयल एरिया देखील इन्क्लुड आहे का?

**धनराज अग्रवाल :-**

मा. महासभेसमोर शिफारस करायला पाहिजे का? विषय दुसरा आलेला आहे.

**आसिफ शेख :-**

आपल्याला आय.टी. पार्क पाहिजे.

**मोहन पाटील :-**

आय.टी. पार्क आणि आय.टी. पार्क झाल्याबरोबर करवाढ होणार आहे.

**प्रकरण क्र. १३ :-**

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. ५/१/२००४ रोजी माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २००३ अंतर्गत जाहिर केलेल्या धोरणानुसार मालमत्ता कर निवासी इमारती करिता लागू होणाऱ्या दराप्रमाणे आकारणी बाबत.

**ठराव क्र. १८ :-**

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. ५/१/२००४ रोजी माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २००३ जाहिर केलेल्या धोरणांनुसार मालमत्ता कर आकारणी बाबत त्या विषयावर साधक बाधक चर्चा होऊन सदरची बाब धोरणात्मक असल्याने यावर महासभेपुढे सदरचा विषय घेऊन धोरण ठरविण्यात यावे असा ठराव मांडीत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील अनुमोदन :- श्री. आसिफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

हे जे छपाई करीता लागणारे साहित्य आहे तर तुम्ही २४ रुपये प्रति पुस्तक ३८ हजार प्रति पण ह्याची क्वॉन्टीटी आपण लिहिलेली नाही आहे. ९७ हजार रुपये तुमचे खर्च झाले.

**संजय दोंदे :-**

खर्च लागेल.

**धनराज अग्रवाल :-**

खर्च झाला म्हणून तुम्ही सांगत आहात. तर तुम्ही किती पुस्तके छापली आहेत.

**संजय दोंदे :-**

अठराशे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण गोषवाऱ्यामध्ये हे नीट द्यायला पाहिजे की, एवढे अठराशे लागली आणि प्रिंटीगमध्ये एक नियम असतो. तुम्ही जेवढे जास्त बुक छापणार तेवढी तुम्हांला किंमत कमी लागेल. माझ्या अंदाजानुसार जेवढी आपण जास्त क्वॉन्टीटी छापणार तेवढे रेट कमी होणार. तुम्ही प्रति हजाराचा रेट लिहिला आहे. जर आपण एक लाख बुक छापले तर त्याचे रेट फार कमी होते आणि आपल्याला बुक किती लागते हे आपल्याला माहित असते तेवढी आपण छापू शकतो. समजा जर आपल्याला एक लाख बुक लागते तर आपण दिड लाख बुक छापण्याऐवजी एक लाख बुक छापू शकतो. सगळ्यामध्ये आपण क्वॅान्टीटी काहीच लिहिलेली नाही.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्यांनी ह्या ठिकाणी सुचना मांडलेली आहे आणि ती चांगली सुचना आहे. ह्याच्यापुढे आपण जो रेट दिलेला आहे आणि हा अवलोकनाचा विषय आहे. ह्याच्यापुढे मागवताना त्या पद्धतीने मागवा. आता जे आहे ते बरोबर आहे. ह्याच्यापुढे मागवताना त्यांची जी सुचना आहे ती घ्या आणि पुढे मागवताना त्या पद्धतीने मागवा.

**मा. सभापती :-**

संगणक मागविलेले आहेत, सदतीस हजाराचे, ते कुठल्या कंपनीचे मागविले आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

हे जे स्टील कपाट तर अनायडा कंपनीच २,९५०/- आहे आणि मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज ३,४५०/- आहे. तुम्ही मुरबाडकर इंडस्ट्रीजचे दर सर्वात कमी लिहिलेले आहे ते कसे काय?

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य, सभापती साहेबांनी आता प्रश्न विचारलेला आहे त्याचे उत्तर अजूनपर्यंत मिळालेलेच नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आधी त्यांनी देऊ द्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्या ठिकाणी दुरुस्ती आहे. २,९५०/- ऐवजी ३,९५०/- असे आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, अग्निशमन दलाचे गणवेश. एका गणवेशाचे २,३७३/- रुपये एवढे महाग आहे तर ते फायरप्रुफ असते?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

दोंदे, संगणक कोणत्या कंपनीचे आहे, विप्रो कंपनीचे आहे आणि त्याची किंमत ३७ हजार प्रति नग आहे.

**याकुब कुरेशी :-**

साहेब, पान क्र. २ वर नोटा मोजणी व तपासणी मशीन खरेदी करणे. ते ह्याच्यामध्ये एकच दिले आहे. तर माझे असे मत आहे की, महानगरपालिकेचे जेवढ्या शाखा आहेत तिथे पैसे येतात. तर तपासणी तिथेच झाली पाहिजे, जिथे कॅश घेतली जाते.

**आसिफ शेख :-**

सर्व विभागीय कार्यालयात ती मशीन घ्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सर्व विभागीय कार्यालयात मशीन मागविणे.

**धनराज अग्रवाल :-**

दोंदे साहेब, आपण हे जे शर्ट पॅन्टचे आणले आहे ते मी विचारतो की, ते फायरप्रुफ आहेत की काय आहे? क्लासोजी आपण जो ड्रेस घातला तो हिटप्रुफ असतो का? क्लासोजी आपण हा जो ड्रेस आणला आहे त्याच्यात काय खासीयत आहे. २,३७३/- रुपये एका ड्रेसचे आहे.

**क्लासो फर्नांडिस :-**

ते कोट आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

कोटाचे तर आपण पाच हजार रुपये आहे. चार हजार सातशे नव्वद.

**क्लासो फर्नांडिस :-**

ते माझे कोट आहेत आणि हे जे लिहिले आहे शर्ट पॅन्ट तर ते दोन जोड्या शर्ट आहेत आणि दोन जोड्या पॅन्ट आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

येथे एक एक लिहिण्यांत आले आहे.

**क्लासो फर्नांडिस :-**

ते दोन दोन जोड्या आहेत.

**शरद पाटील :-**

येथे प्रति जोडी असे लिहिण्यांत आले आहे आणि प्रति जोडी म्हणजे काय? शर्ट आणि पॅन्ट.

**संजय दोंदे :-**

रेमन्ड कंपनीचा कपडा आहे आणि ते प्रति जोडी आहेत.

**मा. सभापती :-**

जी सन्मा. सदस्यांना अजून काही माहिती पाहिजे तर ती त्यांनी प्रशासनाकडून घेण्यांत यावी आणि हा अवलोकनाचा विषय आहे. तो आपण येथे समाप्त करु या.

**शरद पाटील :-**

प्रशासनाकडून जर अवलोकनाला असेच येत राहिले तर काय बघितले हे कसे व्हायचे.

**धनराज अग्रवाल :-**

ठिक आहे, सभापती साहेब जर प्रश्न विचारायचे नसेल तर विचारत नाही.

**मा. सभापती :-**

मी तुम्हांला बोललो ना, तुम्ही आता जाऊन विचारा.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, वेळेचा प्रश्न नाही आहे. जेव्हा आपल्याकडे अवलोकनाचा विषय येतो आणि टिपणी आपल्याकडे असते. मग जर आपल्याला त्याच्यापेक्षा जास्त माहिती सदस्यांना हवी असेल तर आपण ती माहिती ही घेऊ शकतो आणि सभेच्या अगोदर ही आपण ती माहिती मागवू शकतो.

**धनराज अग्रवाल :-**

मग आपण हा विषय सभेमध्ये कशाला आणायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, प्रश्न तो नाही आहे. आता जेव्हा त्यांना विचारतो की, एक जोडी का दोन जोडी? तर त्यांना ते नक्की माहिती नाही आहे.

**धनराज अग्रवाल :-**

एक जोडी लिहिलेली आहे आणि एकजण सांगतो ते दोन पॅन्ट, दोन शर्ट आणि एकजण सांगतो एक पॅन्ट, एक शर्ट म्हणजे नक्की काय आहे तेच त्यांना माहिती नाही.

**शरद पाटील :-**

नक्की काय आहे ते त्यांना माहिती नाही आणि येथे काही पण ते ठोकमठाक करतात. म्हणजे अवलोकनामध्ये त्यांनी काही पण दिले तर आपण ते मंजुर करायचे का?

**मोहन पाटील :-**

विषय तसा नाही. तुम्ही समजलात का मी काय बोललो ते.

**शरद पाटील :-**

आता त्यांना विचारल्यावर ते सांगतात की, दोन पॅन्ट, दोन शर्ट आहे नंतर सांगतात एक पॅन्ट एक शर्ट आहे म्हणजे ते त्यांना तरी माहिती आहे का?

**मोहन पाटील :-**

आपण सभेच्या अगोदर ही माहिती घेऊ शकतो आणि आपण सभेच्या नंतरही अशी घेऊ शकतो.

**शरद पाटील :-**

आपण सभेच्या अगोदर माहिती घेऊ शकतो तर आपण सभेला असा विषय आणूच नका. त्याची गरज काय आहे? आता कुरेशी साहेबांनी त्यांना विचारले की, २,३००/- रुपयामध्ये एक पॅन्ट एक शर्ट आहेत तर ते नंतर बोलले की, दोन पॅन्ट दोन शर्ट आहेत.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, सन्मा. सदस्यांच्या प्रश्नाचे समाधान होऊ द्या. त्यांना त्यांचे प्रश्न विचारु द्या व त्यांना त्यांचे उत्तर मिळू द्या. समाधान झाले की, त्यांच्या शंकांचे निरःसन होईल. त्यांना जी माहिती पाहिजे ती माहिती द्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल ह्यांनी जो मुद्दा उपस्थित केला यामध्ये प्रति जोडी म्हटले आहे. त्याऐवजी प्रति ड्रेसची किंमत त्यामध्ये आहे. एक शर्ट आणि एक पॅन्ट असा त्यामध्ये उल्लेख आहे. प्रति नगास यायला पाहिजे होते तर प्रति जोडली म्हटले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

८ नंबरमध्ये टायर ट्युब मध्ये आपण असे लिहिले आहे की, बाकी सगळे कमिशन एजंट आहेत आणि मॅन्युफॅक्चरिंगकडून पैसे घेतो तर आपण दोघांचे रेट दिलेले नाही. आपण मॅन्युफॅक्चरिंगचेही रेट

दिले नाही आणि कमिशन एजंटचेही रेट दिले नाही. मग काय भावाने घेणार हे आम्हांला माहिती नाही आणि हा विषय काय आहे ते आपण आम्हांला सांगा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

दोंदे ह्यात दर द्यायला पाहिजे होते.

**धनराज अग्रवाल :-**

ह्यात दर द्यायला पाहिजे होते.

**शरद पाटील :-**

तुमच्याकडेच ठेवायचे होते आम्हांला काहीच दाखवू नका.

**धनराज अग्रवाल :-**

असे द्यायला पाहिजे होते की, दिपू टायर, मयूर टायर्स, वाय.सी.स्पेअर्स, ए.डी. मोटर्स ह्यांचे रेट काय आहे? व ह्यांचे रेट जास्त आहेत म्हणून आपण कंपनीचे रेट घेतले आहेत आणि कंपनीचा हा रेट आहे ते आपण दाखवायला पाहिजे. तुम्ही आता काय रेटने घेणार हे आम्हांला आता काय माहिती. नुसता तुम्ही प्रस्ताव मांडला व अवलोकन झाले.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सदर कंपनीचा रेट एवढा आहे ते यायला पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, ही टिपणी घेताना तुम्ही तरी बघितले पाहिजे की, ह्याच्यात बरोबर लिहिले आहे की नाही.

**मा. सभापती :-**

टिपणी तर प्रशासनाकडून येते.

**धनराज अग्रवाल :-**

प्रशासनाला सांगा तुम्ही. अशीच जर टिपणी देत असाल तर त्याचा काय उपयोग आहे.

**आसिफ शेख :-**

आपण सभापती साहेबांना दोष देऊन काय उपयोग आहे. आपण सभापती साहेबांना कशाला बोलत आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

ठेका दिला आहे तो किती महिन्यासाठी दिला आहे ते देखील लिहिण्यांत आलेले नाही. गाडीतून पंक्चर काढण्याचा ठेका किती महिन्यासाठी दिला आहे त्याचा येथे उल्लेख केलेला नाही. म्हणजे आम्हांला मोघममध्ये देऊन येथे काम करायचे असेल तर आपण येथे विषय कशाला आणला हे आपण मला सांगा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

मे. ए. डी. मोटर्स ह्याच्या एम.आर.एफ. टायर्सची किंमत आहे चार हजार पाचशे रुपये. बिरला कंपनीच्या टायर्सची किंमत आहे चार हजार तीनशे रुपये आणि सीयाट टायर्सची किंमत आहे चार हजार तीनशे रुपये.

**मा. सभापती :-**

कसले पण? गाडीचे का ट्रकचे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ट्रकच्या टायर्सच्या टाटा ४०७ चे त्यानंतर टाटा ६०९ चे टायर्सचे रेट आहेत, चार हजार पाचशे. एम.आर.एफ., बिरला कंपनी चार हजार तीनशे रुपये. सीयाट कंपनी चार हजार तीनशे रुपये.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, आपण कितीचे घेतले आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही सीयाट कंपनीकडून प्रति नगास २,५९६/- रुपये.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे गाड्या कधी आल्या आहेत?

**धनराज अग्रवाल :-**

ठेका कितीमध्ये दिला आहे?

**आसिफ शेख :-**

एखादी नविन गाडी विकत घेतल्यावर त्याची गॅरेंन्टी असते का नाही, वर्ष-दोन वर्ष?

**धनराज अग्रवाल :-**

ठेका कितीमध्ये दिला आहे? काहीतरी एक रुपये, दोन रुपये, पाच रुपये. काहीतरी असेलच ना?

**शरद पाटील :-**

हा विषय बरोबर आहे की, गाड्या आल्या कधी?

**आसिफ शेख :-**

सभापती साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याचे उत्तर द्या की, गाड्या जर आता आलेल्या आहेत आणि एवढी नविन गाडी घेतल्यानंतर कमीत-कमी त्याची गॅरेंटी असते, वॉरंटी पिरियड असतो, एक वर्ष, दोन वर्ष आणि त्या दरम्यान गाडीला जर काही झाले तर कंपनी नविन गाडी बदलून देते.

**मा. सभापती :-**

घाण पाणी उचलण्याची गाडी किती दिवसापासून बंद आहे. आपण ती गाडी वर्षभर बंद ठेवणार आहात का?

**संजय दोंदे :-**

साहेब, कालच ती गाडी दुरुस्त करण्यांत आली.

**मोहन पाटील :-**

गाड्या कधी आल्या आहेत ते सांगा आणि गाड्या जुन्या असतील तर टायर्स शेवटी केव्हा बदली केले होते ते सांगा. किती पिरियडमध्ये टायर्स बदली करतात ते सांगा. जसे एका वर्षात करतात की, सहा महिन्यात करतात.

**याकुब कुरेशी :-**

टायर्सचे कोणीच सांगू शकत नाही. टायर कधी फाटू शकतो. गाडी किंती जुन्या आहेत नविन आहेत आणि एखादा दगड लागला की फाटतो टायर. त्यामुळे तो जजमेंन्ट आपण काढू शकत नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

कचऱ्यांच्या डंपरचे फक्त टायर्स मागविण्यांत आले आहेत. अन्य कोणत्याही वाहनांची मागणी मागविण्यांत आलेली नाही आहे आणि मागविण्यांत ही येणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मे. दिपू टायर कंपनीला पंक्चर काढण्याचा ठेका कितीला दिला आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

टायर पंक्चर फिटींग ३०/- रुपये लहान आणि मोठ्या टायरला ३०/- रुपये आणि पॅच फिटींग जर असेल तर ४०/- रुपये. नविन वॉल बॉडी फिटींग असेल तर ६०/- रुपये आणि वॉल फिट फिटींग असेल तर ५/- रुपये.

**प्रकरण क्र. १४ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (भांडार विभाग)

**ठराव क्र. १९ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार खालील कामांना मंजुरी दिलेली आहे.

**१) जकात विभागांस लागणारी छपाई करुन पुरवठा करणे.**

महानगरपालिका जाहिर कोटेशन नोटीसीनुसार दि. ०३/०५/२००३ रोजी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपले दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. श्वेता प्रिंटींग प्रेस | मे. वेदांत प्रिंटींग पॉईंट | मे. स्काय टच |
|---|---|---|---|---|
| १) | जकात पावती पुस्तके<br>सा. ५'' X ६.५'' | रु. २४.५० प्र. बुक | रु. ३१.०० प्र. बुक | ३२.५० प्र. बुक |
| २) | जकात दरसुची<br>सा. ७'' X ८'' | रु. ४८००/-<br>प्र. हजारी | रु. ६,१००/-<br>प्र. हजारी | रु. ५,४००/-<br>प्र. हजारी |
| ३) | विविध प्रकारचे नमुने फॉर्म<br>सा. ८'' X १३''<br>एक बाजू छपाई<br><br>दोन बाजू छपाई | <br><br>रु. ५६०/-<br>प्र. हजारी<br>रु. ७६०/- | <br><br>रु. ५९०/-<br>प्र. हजारी<br>रु. ७९०/- | <br><br>रु. ५७०/-<br>प्र. हजारी<br>रु. ८००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्र. हजारी | प्र. हजारी | प्र. हजारी |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **''मे. श्वेता प्रिटींग प्रेस''** यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने मंजुर करुन छपाई केलेली आहे. सदर कामी रक्कम रु. ९७,३००/- खर्च झालेला आहे.

## २) कार्यालयाकरिता नविन फर्निचर खरेदी करणे :-

दि. ०९/०६/२००३ रोजी ''दै. लोकमत'' या वृत्तपत्रातील जाहिर निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपले दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | स्टील कपाट सा. ७८''X३६''X१९'' | स्टील टेबल सा. ४८''X२४''X३०'' | केन खुर्च्या 'एस' टाईप फुल आर्म |
|---|---|---|---|---|
| १) | मे. गद्रे स्टील वर्क्स | रु. ३६९०/- प्र. नग | रु. १७८०/- प्र. नग | रु. ४७८/- प्र. नग |
| २) | मे. महाराष्ट्र भांडी भांडार | रु. ३६९८/- प्र. नग | रु. १८९४/- प्र. नग | रु. ४६९/- प्र. नग |
| ३) | मे. पारुल इंटरप्रायजेस | रु. ५४५०/-<br>रु. ४९००/- प्र. नग | रु. ३२००/-<br>रु. २८००/- प्र. नग | रु. ७००/-<br>रु. ६१०/- प्र. नग |
| ४) | मे. मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज | रु. ३४५०/- प्र. नग | रु. २४९०/- प्र. नग | रु. ५९०/- प्र. नग |
| ५) | मे. एम.एस.एस.आय. डी.सी. | रु. ४२००/- प्र. नग | रु. २४५०/- प्र. नग | रु. ५४०/- प्र. नग |
| ६) | मे. अनायडा इंटरप्रायजेस | रु. २९५०/- प्र. नग | रु. २४७०/- प्र. नग | रु. ९५०/- प्र. नग |
| ७) | मे. वोरा इंटरप्रायजेस | रु. ४०६५/- प्र. नग | रु. २३४९/- प्र. नग | रु. ५०५/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता स्टील कपाटांसाठी **''मे. मुरबाडकर बिझनेस इंडस्ट्रीज''** यांचे व स्टील टेबल व खुर्च्यांसाठी **''मे. गद्रे स्टील वर्क्स''** यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने मंजुर करुन फर्निचर खरेदी केलेले आहे. सदर कामी रक्कम रु. २,३७,७८०/- इतका खर्च झालेला आहे. तसेच महानगरपालिका प्राथमिक शाळांकरीता वरील मंजुर दराने टेबल खुर्च्या खरेदी करणेंस मंजुरी दिलेली असून रक्कम रु. २,४०,१३२/- इतका खर्च झालेला आहे.

## ३) मा. उपायुक्त (मु.), बांधकाम, नगररचना, विरोधी पक्ष नेता, आस्थापना, सचिव व आरोग्य विभाग कार्यालयाकरिता संगणक खरेदी करणे.

बांधकाम विभागाने दि. १२/०६/२००३ रोजीच्या जाहिर कोटेशन नोटसीनुसार संगणकप्रणाली पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे ठेकेदारांनी दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. आदर्श प्रिंटर्स | मे. जे ॲण्ड जी कॉम्प्युटर्स | मे. ध्रुव कॉम्प्युटर्स |
|---|---|---|---|---|
| १) | पेंटीयम ४ कॉम्प्युटर एच.पी. डेस्कजेट प्रिंटरसह | रु. ३७,०००/- प्र. नग | रु. ३९,३५०/- प्र. नग | रु. ३८,८२०/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **''मे. आदर्श प्रिंटर्स''** यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने मंजुर करुन एकूण ७ नग संगणक त्याच दराने खरेदी केलेले आहेत. सदर कामी रक्कम रु. २,६२,५००/- इतका खर्च झालेला आहे.

## ४) नोटा मोजणी व तपसणी मशीन खरेदी करणे.

| अ.क्र. | तपशिल | मंजुर दर | परिमाण |
|---|---|---|---|
| १) | गोदरेज फुसडअर क्रेन्सी काऊन्टींग मशीन नोटा तपासणी यंत्र | रु. १,१०,०००/- (जकात व वाहतुक खर्चा व्यतिरिक्त) | १ नग |

वरीलप्रमाणे मशीन कंपनीचे अधिकृत विक्रेता **''मे. मेहेर सेल्फ ॲण्ड सिक्युरिटी''** यांचेकडून खरेदी केलेले असून सदर कामी रक्कम रु. १,१३,८६७/- इतका खर्च झालेला आहे.

५) **अग्निशमन दलातील वाढीव कर्मचा-यांकरिता गणवेश व इतर साहित्य खरेदी करणे.**

दि. ३०/०८/२००३ रोजी ''दै. सुरजप्रकाश'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपले दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. साई प्रिंटर ॲण्ड स्टेशनरी | मे. हर्षद इंटरप्रायजेस | मे. निलेश इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| १) | शर्ट पॅन्ट | रु. २४५०/- प्र. जोडी | रु.२३७३/- प्र. जोडी | रु. २४२५/- प्र. जोडी |
| २) | सिंगल बटन कोट | रु. ४८५०/- प्र. नग | रु. ४७९०/- प्र. नग | रु. ४८००/- प्र. नग |
| ३) | गमबुट | रु. ६२०/- प्र. जोडी | रु. ५९८/- प्र. जोडी | रु. ६१०/- प्र. जोडी |
| ४) | चामड्याचे बुट | रु. ८१०/- प्र. जोडी | रु. ७९५/- प्र. जोडी | रु. ८०५/- प्र. जोडी |
| ५) | कॅनव्हास बुट | रु. १६०/- प्र. जोडी | रु. १४६/- प्र. जोडी | रु. १५०/- प्र. जोडी |
| ६) | मोजे | रु. ५५/- प्र. जोडी | रु. ४६/- प्र. जोडी | रु. ५०/- प्र. जोडी |
| ७) | लॉकर | रु. २७७५/- प्र. नग | रु. २६९९/- प्र. नग | रु. २७५०/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **''मे. हर्षद इंटरप्रायजेस''** यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने मंजुर करुन गणवेश व इतर साहित्य खरेदी केलेले आहे. सदर कामी रक्कम रु. १,९९,८९३/- इतका खर्च झालेला आहे.

६) **महानगरपालिका सन २००४ दैनंदिनी छपाई करणे.**

दि. १७/०१/२००४ रोजी ''दै. सुरजप्रकाश'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपले दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. प्रमोद आर्ट प्रिंटर्स | मे. पर्ल प्रिंटर्स | मे. सिद्धी इंटरप्रायजेस | मे. चंडीका प्रिंटर्स |
|---|---|---|---|---|---|
| १) | दैनंदिनी छपाई करुन पुवठा करणे (निविदेतील तपशिलानुसार) | रु. २००/- प्र. नग | रु. २२०/- प्र. नग | रु. २१०/- प्र. नग | रु.२७५/- प्र. नग |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **''मे. प्रमोद आर्ट प्रिंटर्स''** यांचे दर सर्वात कमी व वाजवी असल्याने मंजुर करुन दैनंदिनी छपाई केल्या आहेत. सदर कामी रु. २,००,०००/- इतका खर्च झालेला आहे.

७) **महानगरपालिका कर, पाणीपुरवठा व जन्म-मृत्यु नांदणी विभागाची हिस्ट्री डेटा एंन्ट्री करणेकामी ठेका देणे.**

दि. ०९/०१/२००४ रोजी ''दै. लोकमत'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपले दर सादर केले आहेत.

| कामाचे नांव | ठेकेदाराचे नांव | दर प्र. महिना प्र. ऑपरेटर |
|---|---|---|
| डेटा इंन्ट्री ऑपरेटर ठेक्याने पुरवठा करणे | १) मे. आदर्श प्रिंटर्स | रु. २२००/- |
| | २) मे. डेटाकॉन सर्विसेस | रु. २८००/- |
| | ३) मे. ब्ल्यु बर्ड सिस्टम | रु. २५९९/- |
| | ४) मे. एस.व्ही.न्युयॉर्क कम्प्युटर लिंक | रु. ७५००/- रु. १.९९ प्र. इंट्री |
| | ५) मे. व्ही. एस. कम्प्युटर्स | रु. ४५००/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता ''मे. आदर्श प्रिंटर्स'' यांचे दर सर्वात कमी आहेत. परंतु सदरचे ठेकेदार श्री. राजकुमार घरत दि. १५/०१/२००४ पासून शिक्षण विभागांत ठेक्याने कामावर रुजू झाल्याने सदरचे काम त्यांना देता येणार नाही. त्यामुळे दि. २१/०१/२००४ रोजी त्यांनी दिलेल्या पत्रानुसार त्यांची निविदा नाकरली व द्वितीय कमी दराचे निविदाधारक **''मे. ब्ल्यु बर्ड सिस्टम''** यांना वाटाघाटीसाठी बोलावून चर्चा केली. झालेल्या चर्चेनुसार सदरचे ठेकेदार यांनी दर कमी करुन रु. २३३९/- हा दर मान्य केला. सदरचे दर वाजवी असल्याने त्यास मंजुरी देऊन कामांस सुरुवात केलेली आहे. सदर कामी वरील मंजुर दरानुसार अंदाजे रु. ३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**८) महानगरपालिका वाहनांसाठी नवीन टायर-ट्युब खरेदी करणे व टायर-ट्युब पंक्चर सर्व्हिसिंग कामी वार्षिक ठेका देणे.**

दि. ०२/०८/२००३ रोजी ''दै. आपला वार्ताहर'' व ''दै. सुजरप्रकाश'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार मुदतीत एकूण चार ठेकेदारांनी निविदा सादर केल्या आहेत. (१) मे. दिपू टायर सर्व्हिस (२) मे. अे. डी. मोटर्स (३) मे. मयुर टायर्स (४) मे. वाय.सी. स्पेअर्स

परंतु नविन टायर-ट्युब खरेदी करणेबाबत निविदेतील दर कंपनी दरापेक्षा जास्त असल्याने सदरच्या निविदा नाकारुन नवीन टायर-ट्युब उत्पादक कंपनीकडून खरेदी करणेंस मंजुरी दिलेली आहे. तसेच टायर-ट्युब पंचर सर्व्हिसिंगकामी मे. दिपू टायर्स सर्व्हिस यांची निविदा सर्वात कमी व वाजवी दराची असल्याने मंजुर केलेली आहे.

**९) महानगरपालिका कामांसाठी रिक्षा भाड्याने घेणेकामी वार्षिक ठेका देणे.**

दि. १५/०७/२००३ व दि. १६/०७/२००३ रोजी अनुक्रमे ''दै. सुरजप्रकाश'' व ''दै. आपला वार्ताहर'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. विणा ट्रॅव्हल्स | मे. प्रियंका ट्रॅव्हल्स | मे. प्रसाद ट्रॅव्हल्स | मे. राज टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स |
|---|---|---|---|---|---|
| १) | बजाज ऑटोरिक्षा (चालक, इंधन व इतर आवश्यक प्रणालीसह) | रु. ३३३/- प्र. नग प्र. दिवस | रु. ४००/- प्र. नग प्र. दिवस | रु. ४५०/- प्र. नग प्र. दिवस | रु. ३६५/- प्र. नग प्र. दिवस |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता **''मे. विणा ट्रॅव्हल्स''** यांचे निविदेतील दर सर्वांत कमी असल्याने मंजुर केलेले आहेत.

**१०) अग्निशमन दलाकरिता लागणारे साहित्य खरेदी करणे कामी निविदांना मंजुरी देणे.**

दि. ०३/१२/२००३ रोजी ''दै. लोकमत'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. क्रॅश फायर सर्विस (सर्व करासह) | मे. के. मेहता अॅन्ड कंपनी (कर जादा) | मे. युनिकेअर एमरजन्सी इक्युपमेंट प्रा.लि. (कर जादा) | मे |
|---|---|---|---|---|---|
| १) | फायर फायटींग क्षेत्र<br>(अ) अॅडॉपटर<br>63 MM MALE<br>38 MM FEMALE<br>(ब) बँच पाईप 38 MM FEMALE | रु. ७४६५/- प्र. नग | रु. ४,१५०/- प्र. नग<br>रु. ५५०/- प्र. नग<br><br><br>रु. ५२५/- प्र. नग | ---<br>---<br><br><br>--- | |
| २) | सॉ कटर (चैन सौ कटर) | --- | --- | रु. ७७,७३५/- प्र. नग | |
| ३) | नायलॉन रस्सी (10 MM) | --- | --- | रु. ४७/- प्र. मीटर | |
| ४) | नायलॉन रस्सी (14 MM) | --- | --- | रु. ६३/- प्र. मीटर | |
| ५) | होज बायडींग मशीन | रु. ८२५०/- प्र. नग | रु. ४,८५०/- प्र. नग | --- | |
| ६) | इले. चार्ज टॉर्चेस<br>(१) RN - 1100N<br>(२) RC - 250 | --- | --- | <br>रु. २९,०५४/- प्र. नग<br>रु. २४,९०८/- प्र. नग | |
| ७) | सर्च लाईट<br>SR - 2000 (19510) | --- | --- | रु. ३३,२०५/- प्र. नग | |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व ५ करीता मे. के. मेहता ॲण्ड कंपनी, अ.क्र. २ करिता मे. शार्प सेल्स व अ.क्र. ३, ४, ६, ७ करिता मे. युनिकेअर एमरजन्सी इक्युपमेंट प्रा.लि. यांचे दर सर्वात कमी आहेत. अ.क्र. २ बाबत मे. शार्प सेल्स हे सब सप्लायर्स असल्याने तसेच त्यांना पुर्वानुभव नसल्याने व भविष्यात त्यांचेकडून चांगली सर्व्हिस मिळण्याची शक्यता नसल्याने याबाबत मे. युनिकेअर यांच्या निविदेचा विचार करुन त्यंची फॅक्टरी असल्याने त्यांचेकडून चांगली सर्व्हिस मिळेल या दृष्टीने अ.क्र. २ बाबत मे. युनिकेअर यांची निविदा वाजवी आहे. त्यामुळे अ.क्र. १ व ५ करिता मे. के. मेहता ॲण्ड कंपनी व अ.क्र. २, ३, ४, ६ व ७ करिता मे. युनिकेअर यांची निविदा मंजुर केलेली आहे.

वरील प्रस्तावाचे अवलोकन करुन ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- चंद्रकांत वैती** **अनुमोदन :- मोहन पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही /-**
**सभापती,**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १५ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. २० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरिता **मा. आयुक्त सो.** यांनी मंजुरी दिलेल्या कामांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | मंजुर संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १. | देखभाल व दुरुस्तीसाठी सि. आय. साहित्य खरेदी करणे. (पाणी वितरण व्यवस्था) | रु. ४,९२,७६९/- | धनश्री मजुर कामगार सह. सं. म. अंबरनाथ |
| २. | फाटक जलकुंभ आवारातील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | रु. १,८०,०७७/- | दुर्गा मजुर कामगार सह. सं. म. शहापुर |
| ३. | भांडारगृहाची दुरूस्ती व इतर अनुषांगित कामे करणे. | रु. ३,११,३२५/- | श्री. गजानन मजुर कामगार सह.सं. म. शहापुर. |
| ४. | एम्.आय.डी.सी. (निम्नस्तर) पाण्याच्या उंच टाकीच्या पायाचे मजबुतीकरण करणे. | रु. ४,९७,४१४/- | वैभव मजुर कामगार सह. सं.म. शहापुर. |
| ५. | एम्. आय.डी. सी. (उच्चस्तर) पाण्याच्या उंच टाकीच्या पायाचे मजबुतीकरण करणे. | रु. ४,८४,१६८/- | वैभव मजुर कामगार सह. सं. म. शहापुर. |

तरी उपरोक्त कामांच्या प्रस्तावांचे मा. स्थायी समितीने अवलोकन केलेले आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. हरेश गावंड**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**चंद्रकांत वैती :-**

महाराष्ट्र राज्याचे माजी राज्य वित्त मंत्री आणि राज्यसभेचे माजी खासदार आणि भारतामधील अतिशय विद्याविभूषित असलेले ह्यांची गिनीज वर्ल्ड ऑफ बुकमध्ये ज्यांच्या बावीस डिग्रींची नोंद झालेली

आहे असे उच्चविद्या विभूषित असे व्यक्तिमत्व डॉ. श्रीकांत जिचकर साहेब ह्यांचे काल अपघाती निधन झाले आहे. तर त्यांच्या निधनाचा शोक प्रस्ताव मांडून आपण दोन मिनिटे सभागृहात उभे राहून त्यांना श्रद्धांजली वाहवावी.

**दु:खवटा ठराव क्र. २१ :-**

महाराष्ट्र राज्याचे माजी वित्त मंत्री आणि राज्यसभेचे माजी खासदार आणि भारतामधील अतिशय विद्याविभूषित असलेले ज्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये ज्यांच्या बावीस डिग्रींची नोंद झालेली आहे असे विद्या विभूषित असे व्यक्तिमत्व डॉ. श्रीकांत जिचकर साहेब ह्यांचे अपघाती निधन झाले आहे. त्यांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दु:खात ही सभा सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मोहन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सकाळी ११.५५ वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**